# वज्रमूठ टिकेल का?

**वर्षभरावर येऊन** ठेपलेली लोकसभा आणि त्यानंतर सहा महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना ठाकरे गट या महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन सरकारविरोधात वज्रमूठ आवळली आहे. रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या जाहीर सभेत 'मविआ'ने जणू आगामी निवडणुकांचे एकप्रकारे रणशिंगच फुंकले. राज्यभर अशा सभा होणार आहेत. या सभांमधून केंद्र आणि राज्य सरकार विरोधात जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला जाईल, तर दुसरीकडे सावरकर गौरव, कडवे हिंदुत्व असे भावनिक मुद्दे उपस्थित करून विरोधकांची; विशेषत: उद्धव ठाकरे यांची कोंडी करण्याचा प्रयत्न सत्ताधारी मंडळींकडून केला जाईल. आरोप-प्रत्यारोपांचा सामना जसा उत्तरोत्तर रंगत जाईल तसे त्यात कट्टरतेचे गडद रंगही भरले जातील. अलीकडच्या काळातील राजकारणाची गती लक्षात घेता वर्ष-दीड वर्षाचा कालावधी तसा खूप मोठा आहे. या काळात विरोधकांना आपली झाकली वज्रमूठ कायम ठेवण्यासाठी बरीच कसरत करावी लागेल. विरोधकांच्या आघाडीत फूट पाडण्याचे प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून जोरकसपणे केले जातील. आपले मासे त्यांच्या गळाला लागणार नाहीत, याबाबत दक्ष राहावे लागेल. छत्रपती संभाजीनगरातील पहिल्याच सभेला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असला तरी केवळ गर्दीवर विसंबून गाफील राहिले तर तिघाडीची बिघाडी होण्यास वेळ लागणार नाही. येत्या काळात शिवसेनेतील फाटाफूट आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय अपेक्षित आहेत. हे दोन्ही निर्णय महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा ठरवणारे असतील. ओबीसी आरक्षणाचा तिढा सुटला तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होईल. महापालिका, जिल्हा परिषदांची निवडणूक ही आगामी सार्वत्रिक निवडणुकांची लिटमस टेस्ट असेल. स्थानिक निवडणुकांमध्ये सर्वच पक्षांत इच्छुकांची भाऊगर्दी असते. जागावाटप करताना महाविकास आघाडीतील पक्षांना कसरत करावी लागेल. आजवरचा अनुभव असा आहे की, अशा निवडणुकांत सोईनुसार आघाड्या बनतात. मित्रपक्षच पाडापाडीचे खेळ करतात. काँग्रेस-राष्ट्रवादीची मते एकमेकांना ट्रान्सफर होतात. प्रश्न आहे तो, बाळासाहेब ठाकरे यांना मानणाऱ्या कट्टर शिवसैनिकांची मते आघाडीतील इतर पक्षांना ट्रान्सफर होतील का? कारण, आजवर दोन्ही काँग्रेसच्या विरोधातच शिवसैनिकांचा संघर्ष राहिलेला आहे. २०१४ ची विधानसभा आणि मागील मुंबई महापालिका निवडणुकीचा अपवाद वगळता भाजपा-शिवसेना आमने-सामने आलेले नाहीत. मात्र, आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले आहे. उद्धव ठाकरे यांच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्याने दोन्ही काँग्रेससोबत राहण्याखेरीज पर्याय उरलेला नाही. राज्यात शिवसेनेकडे सुमारे पावणेसतरा टक्के मते आहेत. चाळीस आमदार फुटून गेल्याने मतांची विभागणी अटळ आहे. राष्ट्रवादी (१६ टक्के) आणि काँग्रेस (१५.३७ टक्के) यात ठाकरे किती भर घालू शकतील? सध्या तरी महाविकास आघाडी तुल्यबळ आहे. नुकत्याच झालेल्या विधानपरिषद आणि विधानसभेच्या पोटनिवडणुकीत विरोधकांची एकजूट दिसून आली. विशेषत: कसब्यातील निकालाने विरोधकांचे मनोधैर्य उंचावले आहे, तर याच निकालातून बोध घेऊन भाजपाने आक्रमक रणनीती आखल्याचे दिसून येते. काँग्रेस-राष्ट्रवादीपेक्षाही उद्धव ठाकरे हे त्यांचे टार्गेट आहे. ठाकरेंना सहानुभूती मिळू नये, म्हणून सावरकरांच्या माध्यमातून हिंदुत्वाचा मुद्दा तापविला जात आहे. येत्या काळात केंद्रीय तपास यंत्रणा महाराष्ट्रात पुन्हा सक्रिय होऊ शकतात. 'मविआ'तील काही बड्या नेत्यांना अडचणीत आणले जाऊ शकते. विरोधकांच्या एकीला सुरुंग लावण्याचे प्रयत्न होतील. कालच्या सभेतील भाषणांवर कटाक्ष टाकला तर दोन्ही काँग्रेससाठी भाजपा, तर ठाकरे यांच्यासाठी प्रामुख्याने एकनाथ शिंदे हेच टार्गेट असल्याचे दिसून येईल. मुंबई उपनगरे, खान्देश आणि मराठवाड्यातील बरेच आमदार शिंदे यांच्या गळाला लागले आहेत. तिथे ठाकरे यांची शक्ती पणाला लागेल, तर उर्वरित प्रदेशात मविआचा थेट सामना भाजपाशी असेल. शेजारील कर्नाटक विधानसभेचे बिगुल वाजले आहे. या राज्यातील जनतेचा कौल सत्ताधारी भाजपाच्या विरोधात गेला तर तो देशभरातील विरोधकांच्या ऐक्याची नांदी ठरू शकेल. मात्र, तोपर्यंत मविआच्या नेत्यांनी आवळलेली ही वज्रमूठ कुठवर शाबूत राहाते हे पाहणे रंजक असेल.

# पाण्यासाठी पेट्रोलसारखे पैसे मोजावे लागले तर?

## जागतिक साधनसंपत्ती म्हणून पाण्याचे मूल्य लक्षात घेता त्याचे वर्णन 'आगामी काळातील तेल' असे केले गेले आहे. खरेच तसे झाले तर?

**विजय बाविस्कर**



समूह संपादक, लोकमत



**वर्ष २०५०** उजाडेपर्यंत म्हणजे आणखी फार फार तर २७ वर्षांपर्यंत जगातील अर्ध्या लोकसंख्येसमोर पाण्याचे संकट असेल. जगभरात पाण्याचा एकूण वापर जेवढा होतो, त्यातील २५ टक्के वापर एकट्या भारतात होतो. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार २०५० पर्यंत जगभरात पाण्याची मागणी आजपेक्षा तब्बल ५५ टक्क्यांनी वाढणार आहे. हे इतके पाणी मिळविणार कोठून, हा प्रश्न जगाला सतावत आहे. पाण्याची ही टंचाई लक्षात घेऊन भविष्यातील 'तेल' असे पाण्याला म्हटले जाऊ लागले आहे. खरेच तसे झाले तर?

पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के असले, तरी पिण्यायोग्य पाण्याचे प्रमाण फक्त ३ टक्के आहे. या तीन टक्के पाण्यावरच आपला सारा खेळ आहे. सर्व जिवांना जगण्यासाठी पाणी लागते. अशा स्थितीत पेट्रोलची जागा या पाण्याने घेतली तर काय होईल?

२०१८ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहरात पाणीटंचाई उभी राहिली. प्रत्येक व्यक्तीला तिथे दिवसाकाठी ५० लिटरची मर्यादा घालण्यात आली. भारताने २०१९ मध्ये चेन्नईत अभूतपूर्व पाणीटंचाई अनुभवली. केपटाऊनच्या आधीच रेल्वेने पाणी आणून महाराष्ट्रातील लातूरची तहान भागवावी लागली. पृथ्वीवरील पाण्याचा साठा संपत आहे, हे सांगण्यासाठी आणखी किती उदाहरणे द्यायची? उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या सीमेजवळ बुंदेलखंड भागात मुलांना लग्नासाठी मुलीच मिळत नाहीत. कारण काय, तर इथे महिलांना पाण्यासाठी रोज मोठी पायपीट करावी लागते. महाराष्ट्रातदेखील असे 'बुंदेलखंड' आढळतील. विशेषत: मराठवाडा, विदर्भात अशी गावे शोधणे कठीण नाही. लग्नाचा विचार आला की या गावात आधी डोळ्यांत पाणी येते. ते पैशांसाठी नाही तर लग्नासाठी पाणी कोठून आणायचे यासाठी! एकतर पुरेसे पाणी मिळत नाही. मिळाले तरी ते शुद्ध असेलच याची खात्री नाही.

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार जगातील २६ टक्के लोकसंख्येला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही. 'युनायटेड नेशन्स वर्ल्ड वॉटर डेव्हलपमेंट रिपोर्ट- २०२३'मध्ये प्रत्येकाला २०३० पर्यंत पिण्याचे शुद्ध पाणी आणि स्वच्छतेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी रूपरेषा देण्यात आली आहे. या अहवालानुसार गेल्या ४० वर्षांत जागतिक पाण्याचा वापर दरवर्षी सुमारे एक टक्का दराने वाढत आहे. जीव जगवणारे पाणी दूषित झाले की मृत्यूचे कारण ठरते. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२२ च्या अहवालानुसार दूषित पाणी प्यायल्याने जगभरात दरवर्षी १४ लाख लोकांचा मृत्यू होतो. ७.४ कोटी लोकांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. पाणीटंचाईच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणामांमुळे भारतात दरवर्षी दोन लाखांहून अधिक लोक जीव गमावतात. 'युनिसेफ'च्या २०२१ च्या आकडेवारीनुसार चारपैकी एकाला म्हणजेच साधारण दोन अब्ज लोकांना पिण्यायोग्य पाणी मिळत नाही.

जगाच्या लोकसंख्येतील १७.५ टक्के लोक भारतात राहतात. मात्र, पृथ्वीवरील एकूण पाण्याच्या स्रोतांपैकी केवळ चार टक्के स्रोत भारतात आहेत. मोठी लोकसंख्या असलेल्या भारतात पाण्याचा वापरही वाढू लागला आहे. विकसित देश आणि विकासाच्या वाटेवर असलेले भारतासारखे देश भविष्यातील पाणीटंचाईच्या प्रश्नाने हैराण आहेत. समुद्राच्या पाण्यापासून पिण्याचे पाणी तयार करण्याचा न परवडणारा प्रकल्प याच चिंतेतून आकाराला येऊ पाहत आहे. पाण्यावरून तिसरे महायुद्ध होईल की नाही माहीत नाही. मात्र, पाण्यासाठी सख्ख्या भावापासून ते गाव, विभाग, राज्य आणि देशांची भांडणे आपण पाहतच आहोत. त्याचे जागतिक पडसाद कधी उमटतील, याचा नेम नाही. संयुक्त अन्न आणि कृषी संघटनेच्या अहवालानुसार सर्वाधिक ७० टक्के पाणी हे शेतीसाठी वापरले जाते. २२ टक्के पाणी उद्योगासाठी आणि ८ टक्के पाणी घरगुती वापरासाठी लागते.

महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया हा सहकारी साखर कारखाने आहेत. पश्चिम महाराष्ट्रात असे आहेच. मराठवाडा आणि विदर्भ या दुष्काळी भागातही हेच घडते आहे. परिणामी, राज्यात धरणाच्या पाण्यातील जवळपास ७० टक्के पाणीवाटा हा उसाची शेती संपवत आहे. राज्यातील आठ विभागांत गतवर्षी उसाचे जवळपास एक लाख हेक्टर क्षेत्र वाढले. मग पाणीबचत कशी होणार? ठिबक सिंचन शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे, ही त्यातल्या त्यात एक समाधानाची बाब. मात्र, ठिबकचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ती किती?

पृथ्वीवरील पाण्याची स्थिती समजून घेण्यासाठी नासाने २००२ मध्ये ग्रेस मिशन सुरू केले. जवळपास १५ वर्षे हे अभियान चालले. नासाच्या निरीक्षणानुसार जिथे मुबलक पाणी आहे तिथे वारंवार पूरस्थिती ओढवते आणि कोरड्या प्रदेशांमध्ये वारंवार दुष्काळ पडतो. वातावरण बदलाचा परिणाम आम्हाला कोणते दिवस दाखवेल याचा अंदाज येत नाही. २२ मार्चला जगभरात जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. अशा दिवशी पाण्याचे महत्त्व पटवून देणे-घेणे होते तेवढेच, पुन्हा येरे माझ्या मागल्या.

नासाच्या स्ट्रेटोस्फियर ऑब्झर्व्हेटरी फॉर इन्फ्रारेड ॲस्ट्रॉनॉमीने चंद्रावर पाण्याचा शोध लावला. नासाने दिलेल्या माहितीनुसार, चंद्राच्या दक्षिण गोलार्धातील सर्वांत मोठ्या खड्ड्यांपैकी एक असणाऱ्या क्लेवियस क्रेटरमध्ये पाण्याचे अणू आहेत. चंद्रावर पाणी आहे, हे चांगलेच, पण निसर्गाने पृथ्वीवर भरभरून पाणी दिले आहे. ते वाचवायचे कसे? मुरवायचे कसे आणि पुढच्या पिढ्यांसाठी ते उरवायचे कसे? त्याचा विचार आणि त्यानुसार कृती सर्वांनीच करायला हवी.

vijay.baviskar@lokmat.com

**अन्वयार्थ**

# सध्या देशात अनेकांना फार अस्वस्थ वाटते आहे, कारण...

## राजकीय विरोधक म्हणजे ज्यांच्यावर राग धरावा, ज्यांची थट्टा करावी किंवा ज्यांना चिरडून टाकावे, असे व्यक्तिगत शत्रू नव्हेत, हे लक्षात घेणे गरजेचे आहे !

**अश्वनी कुमार**



माजी केंद्रीय कायदामंत्री

**भारताच्या** राज्यघटनेची पायमल्ली होत असल्याची उदाहरणे हल्ली वारंवार समोर येत आहेत. लोकशाहीचे सत्त्व आणि खोली यावर त्यामुळे प्रश्नचिन्ह लागताना दिसते. अलीकडच्या काळात विरोधी पक्षनेत्यांनी संसदेत केलेल्या निवेदनांच्या नोंदी कामकाजातून वगळण्यात आल्या. राज्यसभेत पंतप्रधानांच्या भाषणात अडथळे आले. काही अपवाद वगळता लोकप्रतिनिधींचे सभागृहातले वागणे बालिशपणाचे असल्याने संसदेचे पावित्र्य नष्ट होत आहे. जातीवरून भेदभाव केला गेल्याने आलेला मानसिक ताण असह्य होऊन देशाच्या अग्रगण्य शिक्षणसंस्थेत एका १८ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली ; तसेच १६ वर्षांच्या एका विद्यार्थ्याला प्राचार्यांनी बदडून काढले ; कारण तो मुलगा त्यांच्या बाटलीतील पाणी प्यायला होता. या सर्व घटना सामाजिक विषमता अजूनही थैमान घालत असल्याचे यातनादायी स्मरण देणाऱ्या होत.

उत्तर प्रदेशमध्ये विरोधी पक्षाच्या एका विद्यमान आमदाराला १५ वर्षांपूर्वी वाहतूक अडवल्याच्या प्रकरणात दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली ; ही शिक्षाही अवाजवीच होती. राज्याच्या विधानसभेतील या सदस्याची आमदारकी त्यामुळे गेली. खटल्यांच्या कामकाजातून दमनचक्र फिरवले जात आहे. न्याय यंत्रणेची चाके फिरली की, अनेकांच्या प्रतिष्ठा धुळीला मिळतात. ही एक मानभंगाची उपाय नसलेली, न संपणारी कहाणी होऊन बसली आहे.

ही अशी संस्थात्मक अस्वस्थता देशाच्या घटनात्मक लोकशाहीच्या इमारतीला तडे जात असल्याचे सांगते. मात्र, या ढासळत्या लोकशाहीविषयी आपल्या राजकीय व्यासपीठांवर कोठेही फारसे बोलले जात नाही. राजकीय पक्षांचे नेते भूतकाळ उकरून काढत एकमेकांवर चिखलफेक करतात. आपली राजकीय भाषाही अत्यंत दांभिक आणि व्यक्तिगत द्वेषाने भरलेली, राजकीय संकुचितपणा दाखवणारी झाल्याने वातावरण कलुषित होते. परस्परांचा आदर राखला जाईल, असे वचन घटनेने दिले. त्याला या वातावरणात नख लागते. त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडतो. भाषा, संस्कृती, कल्पनाशक्ती आणि इतिहास हे घट्ट धाग्याने बांधलेले आहेत, हे आपल्याला ठाऊक आहे. आरडाओरडा करून नव्हे तर सभ्यपणे बोलूनच जे म्हणायचे ते लोकांपर्यंत पोहोचत असते. आपल्या आदरणीय पूर्वजांनी त्यांची भव्य स्वप्ने गद्य -पद्यातून व्यक्त केली, ती आदर्शवादाने ठासून भरलेली होती. भव्य, उदात्त अशा ध्येयांसाठी त्यांनी मने प्रज्वलित केली. त्यांची भाषा हृदय आणि बुद्धी यांच्यातील दुवा झाली. लोकशाहीची भाषा सगळ्यांचे समजून घेणारी, संतुलित विचारांची आणि समजावून सांगणारी असते. ती कोणाला दुखावत नाही. उलट आदर करते. राजकीय विरोधक म्हणजे ज्यांच्यावर राग धरावा, ज्यांची थट्टा करावी किंवा ज्यांना चिरडून टाकावे, असे व्यक्तीगत शत्रू नव्हेत ! लोकशाही म्हणजे एखाद्या बलदंड माणसाने दीन दुबळ्यांवर हुकूमत गाजवणे नव्हे. अतिरेक टाळून मध्यममार्ग स्वीकारणे लोकशाहीत अपेक्षित असते. सहज संवादातून हे उद्दिष्ट गाठता येते. नेतेमंडळी बोलतात कसे याला लोकशाहीत महत्त्व असते. सार्वजनिक जीवनातील व्यक्तीचे स्थान त्यांच्या उच्चारणावर ठरते. आपण कोण आहोत, हेही त्यातून सांगितले जाते. म्हणून असे म्हणावेसे वाटते की, भारतीय लोकशाहीच्या मजबुतीकरणासाठी राजकीय संवादाचा दर्जा वाढवला पाहिजे. सभ्यतेची म्हणून काही ताकद असते. यावर विश्वास असणारे तर्कसंगत असे बोलणे व्हायला हवे.



सत्तारूढांनी लोकसत्ता योग्य प्रकारे वापरावी, हेच प्रजासत्ताकात अभिप्रेत आहे. सत्तेचा गैरवापर होत असेल तर, विरोधकांना त्याविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवता आला पाहिजे. सदसद्विवेकबुद्धीचा आवाज ऐकून जनमताचा कानोसा घेतल्यावर जे समोर येईल त्यावरच आपले राजकीय विश्व उभे आहे. याची वैभवशाली देशाचे नेतृत्व करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांनी निदान कल्पना करावी आणि ते टिकून कसे राहील हे पहावे. तेच त्यांच्यापुढचे सर्वात मोठे आव्हान आहे.

**जगभर**

# सेलफोनच्या जनकाला ५० वर्षांनंतर काय वाटतं?

**जगातला** प्रत्येक जण सध्या कशात बिझी असतो, विशेषत: तरुण मुलांचा दिवस कशात जातो, असं विचारलं तर त्याचं काय उत्तर सांगता येईल? प्रत्येकाच्या दृष्टीनं त्याचं उत्तर वेगवेगळं असेल; पण एक सर्वसाधारण उत्तर द्यायचं ठरलं तर बहुतांश तरुणाई दिवसाचा बहुसंख्य वेळ मोबाइलवर 'टाइमपास' करीत असते. मोबाइलवर ते किमान एक तासापासून ते चार, पाच, सहा तास 'पडीक' असतात. मोबाइलवर ते काही भरीव काम करतात का?- तर तसंही नाही. तो वेळ अक्षरश: फुकट जातो.

गेल्यावर्षी झालेल्या एका जागतिक पाहणीत लक्षात आलं, भारतात मोबाइलवर वेळ घालविण्याचा प्रत्येक व्यक्तीमागे सरासरी वेळ आहे तब्बल पाच तास! तरुणांमध्ये हा कालावधी आणखीच जास्त आहे. या सर्वेक्षणानुसार २०२१मध्ये भारतीयांनी तब्बल ६५५ अब्ज तास मोबाइलवर घालविले. २०१९च्या तुलनेत हा कालावधी ३७ टक्क्यांनी अधिक होता. हाच अहवाल सांगतो, मोबाइल वापरामध्ये भारत पाचव्या क्रमांकावर आहे. भारताच्या आधी आहेत फक्त चार देश. त्यात ब्राझील पहिल्या, इंडोनेशिया दुसऱ्या, दक्षिण कोरिया तिसऱ्या, तर मेक्सिको चौथ्या क्रमांकावर आहे. भारतीयांचा मोबाइल वापराचा वेग पाहता, त्यात आणखी वाढच झाली असेल.

'फादर ऑफ सेलफोन' अर्थात मोबाइलचे जनक म्हणून ज्यांना अख्ख्या जगात नावाजलं जातं, त्या अमेरिकन इंजिनिअर मार्टिन कूपर यांना यासंदर्भात काय वाटतं? बरोब्बर ५० वर्षांपूर्वी म्हणजे ३ एप्रिल १९७३ रोजी त्यांनी सेलफोनचा शोध लावला होता. आज त्यांचं वय ९४ वर्षांचं आहे. आपण लावलेल्या शोधाबद्दल त्यांना काय वाटतं, असा प्रश्न त्यांना यानिमित्त विचारण्यात आला. त्यांचं म्हणणं होतं, आजची तरुणाई ज्या कारणासाठी मोबाइलचा वापर करते आहे, ते पाहून आनंद व्यक्त करावा की, दु:ख हेच मला कळत नाही. तरुणाई मोबाइलच्या इतक्या आहारी जाईल आणि चुकीच्या कारणांसाठी त्याचा वापर करेल, याची मला कल्पना नव्हती. मोबाइलमध्ये प्रचंड पोटेन्शियल आहे आणि तो झपाट्यानं लोकांच्या हातात जाईल याची मला कल्पना होती; पण मोबाइलचा अशा तऱ्हेनं वापर करून तरुणाई स्वत:च्या आरोग्याचं प्रचंड नुकसान करतानाच, वेळेचाही अपव्यय करीत आहे.

त्यांनी पहिला मोबाइल तयार केला, त्यावेळी त्याचं वजन जवळपास एक किलो (८५० ग्रॅम) होतं. फोन हा केवळ लँडलाइनवरूनच केला जाऊ शकतो, हा सर्वसामान्य समज त्यांनी खोडून काढला आणि बघता-बघता मोबाइल सगळ्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग झाला. मार्टिन कूपर यांचं म्हणणं आहे, आज प्रत्येकाच्या



हातात मोबाइल दिसतो, एक किलोच्या मोबाइलपासून तर काही ग्रॅमच्या मोबाइलपर्यंत मोबाइलनं आतापर्यंत बराच मोठा पल्ला गाठला आहे; पण मोबाइलचा उपयोग का आणि कसा करायचा, हेच अजून अनेकांना माहीत नाही, याचं मला फार दु:ख वाटतं. मोबाइल अजूनही अतिशय बाल्यावस्थेत आहे. त्यातून खरी क्रांती तर पुढे घडायची आहे. येत्या काही काळात मोबाइलची जादू आणि त्याची ताकद जगाच्या लक्षात येईल; पण आज आपण मोबाइलला खेळणं करून टाकलंय, तरुणाई तर मोबाइलमुळे अक्षरश: वेडी झाली आहे. खरंच मला याची अपेक्षा नव्हती; पण तरीही मी निराश नाही. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला की, त्याचे दुष्परिणाम दिसतातच.

### माझे नातू, पणतू असं का वागतात?

मार्टिन कूपर म्हणतात, मी जेव्हा लोकांना हमरस्त्यावर फोनवर बोलत किंवा टेक्स्टिंग करीत रस्ता ओलांडताना पाहतो, तेव्हा मलाच त्रास होतो. हे लोक कुठल्या दुनियेत असतात? जगभरातले माझे नातू, पणतू अशा पद्धतीनं मोबाइलचा वापर करतात, तेव्हा त्यांना खरंच 'वेड' लागलं आहे का, असं मला वाटतं; पण या 'तंद्री'तून कधी ना कधी ते बाहेर येतील हेदेखील नक्की.

तरुण पिढीही या अतिरेकातून बाहेर पडेल आणि योग्य वेळी, योग्य गोष्टींसाठीच त्याचा वापर करेल, याबाबत मी आशावादी आहे. उद्या हाच मोबाइल 'जगाचा डॉक्टर' बनेल. प्रत्येकाचा पर्सनल डॉक्टर होईल, अनेक संभाव्य आजार आणि रोगांपासून तो आपल्याला दूर ठेवेल, आधीच त्याचं निदान करेल आणि आपल्या आयुष्याची दोरी आणखी बळकट करेल. त्याची चुणूक आताच दिसतेय; पण यापेक्षाही मोठमोठी कामं मोबाइल करेल.

मार्टिन कूपर आजही विविध कारणांसाठी मोबाइलचा वापर करतात. त्यात आणखी संशोधन करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. तरीही ते म्हणतात, दिवसाचा पाच टक्क्यांपेक्षा जास्त वेळ मी मोबाइलसाठी देत नाही. तरीही संशोधनापासून ते संपर्कापर्यंत आणि इतरही कितीतरी कामं मी मोबाइलच्या माध्यमातून करतो; पण त्यासाठी दिवसाला एक तासापेक्षा अधिक वेळ देण्याची गरज नाही.

**जनमन**

## समृद्धीवरचे मरण टाळा !



**समृद्धी** मार्गावरच्या नव्या अपघातात ३ जण ठार झाल्याची बातमी वाचून वाईट वाटले. या मार्गावर सातत्याने अपघात होतात, त्याचे मूळ कारण तीव्र गतीने चालणारे वाहन लवकर नियंत्रणात न येणे, शिवाय रात्रीचा अंधार असेल तर धोका अधिक असतो.

समृद्धी किंवा चार पदरी रस्त्यावर मागून धडक बसणे किंवा समोरच्या मोठ्या वाहनावर कार सारखे लहान वाहन आदळण्याची शक्यता फार असते. तसे होऊ नये यासाठी आलिशान खासगी बस, मिनी बस, मिनी ट्रकमालक मागच्या बाजूला उभ्या आडव्या व आजूबाजूला रात्री चककाणाऱ्या रेडियम टेप लावतात. त्यामुळे अंधारात ही वाहने दिसतात आणि मागचे वाहनचालक सावध होतात. काही ट्रकच्या बाबतीत रेडियम टेप लावलेली दिसत नाही, शिवाय अनेक ट्रकचा मागचा भाग गडद रंगाचा व त्यावर गडद रंगाची ताडपत्री असते. धूळ व चिखलामुळे मागचे दिवेही दिसत नाहीत. अशा प्रसंगी अपघात सहज होऊ शकतो. केंद्रीय वाहतूक मंत्रालयाने सर्व व्यावसायिक वाहनांचा मागचा भाग फिकट किंवा पांढरा असावा व मागच्या लाल रंगाच्या दिव्यांचा आकार मोठा असावा अशी सक्ती करावी. अंदाजे २३ वर्षांपूर्वी ट्रकच्या मागच्या बाजूला एक पिवळा रंग असलेला आडवा पाइप असणे सक्तीचे केले होते.

**- अमोल म. पाठक,** नागपूर

## सामान्य लोकांच्या खिशाला चाट नको!




**आधार** आणि पॅनकार्ड लिंक करायला सरकार एक हजार रूपये फी आकारत आहे. पैसेवाले आयकर रिटर्न भरत असतात आणि त्यांच्या सीएने हे काम वेळेत केलेले आहे. ज्यांचे लिंकिंग राहिले आहे, ते प्रामुख्याने आयकर विवरण न भरणाऱ्या गरीब वर्गातील आहेत. सरकारने याचा विचार करून ही फी आकारणे बंद करावे. अनेक लोकांनी फक्त बँक खाते उघडण्यासाठी किंवा एफ डी व्याजावर टीडीएस कापला जाऊ नये म्हणून पॅन नंबर घेतलेला आहे. सामान्यांच्या खिशाला कात्री लावणारी ही फी सरकारने रद्द करावी.

**- उपेंद्र खोल्लम**

समकालीन महत्त्वाचे मुद्दे मांडणारी, नवी चर्चा सुरू करणारी वाचक-पत्रे या स्तंभामध्ये प्रसिद्ध केली जातील. आपली पत्रे येथे पाठवा : janman@lokmat.com

**दृष्टिक्षेप**

# लोक पाण्याची बाटली का विकत घेतात ?

## विकतचे बाटलीबंद पाणी पिण्याची अमेरिकन कारणे




**संदर्भ :** कन्झ्युमर इन्साईट्स स्पेशल सस्टेनेबल कंझमशन आणि स्टॅटिस्टा

प्लॅस्टिक कचऱ्याचा प्रश्न उग्र होण्यामागे जगभरात वाढलेला बाटलीबंद पाण्याचा वापर हे एक मोठे कारण आहे. घराबाहेर पडताना घरातले पाणी बाटलीत भरून नेण्याऐवजी दुकानातून पाण्याची बाटली विकत घेण्यामागची नेमकी काय कारणे असावीत, यासाठी एका सर्वेक्षण नुकतेच अमेरिकेत केले गेले. ही पाहणी अमेरिकन लोकांच्या प्राथमिकतांवर आधारित आहे हे खरे असले, तरी प्रगत देशांमध्ये एकूणच प्यायच्या पाण्याकडे पाहण्याची दृष्टी किती वेगाने बदलते आहे हे यातून नक्की जाणवेल आणि आपल्या देशाला शिकता येतील, असे काही धडेही त्यात दिसतील.

**म्हणजे काय?**

# व्हॉटअबाऊटिझम : अहो, मग '.... त्याचं काय?'

**दोन्ही** हात कमरेवर ठेवून डोळे मोठे करून वा गरागरा फिरवत चढ्या आवाजात तुम्हाला कोणी, '.... त्याचं काय?' हा उलट आणि प्रसंगी अडकित्त्यात अडकवणारा प्रश्न विचारलाय कधी? याचं उत्तर अनेक जण (निदान मनातल्या मनात तरी) 'हो, आमच्या सौभाग्यवतींनी विचारलाय की', असे देतील. या 'त्याचं काय'च्या आधी बरंच काही असतं. व्यक्तीनुरूप त्याचा तपशील वेगवेगळा असतो. मात्र, या 'त्याचं काय' प्रश्नात असते जरब, धाक आणि तुमचा पराभव...

भांडण, वादविवाद, वितंडवाद हे सगळीकडे होत असतात. मित्रांमध्ये तर ही भांडणं अनेकदा होतात. पुन्हा त्याचं स्वरूप व्यक्तींनुरूप वेगवेगळं असतं. मात्र, अशावेळी एकमेकांची यथेच्छ उणीदुणी काढली जातात. या परस्परांच्या उणीदुणीच्या कार्यक्रमादरम्यान समोरच्याला गप्प कसं करता येईल, नामोहरम कसं करता येईल, यासाठी भांडणवाद्यांचा आटापिटा चाललेला असतो. एकाहून एक सरस आरोपांचे बाण चालवले जातात. इतरांना माहीत नसलेली कुलंगडी उघड केली जातात. अशावेळी बॅकफूटवर गेलेला समोरचा मग भात्यातून 'त्याचं काय' हे अस्त्र काढतो. यालाच इंग्रजीत व्हॉटअबाऊटिझम असं म्हणतात.

भांडणाच्या ओघात परस्परांवर केल्या गेलेल्या आरोपांना प्रत्युत्तर म्हणून याचं काय, त्याचं काय असं विचारत आपल्या कृतीचं समर्थन करण्याचा प्रयत्न केला जातो. सध्या सुरू असलेली राजकीय सुंदोपसुंदी हे त्याचं



मूर्तिमंत उदाहरण म्हणता येईल. सत्ताधारी भाजपला कोंडीत पकडण्यासाठी काँग्रेसने काही मुद्दा काढावा आणि त्याला उत्तर देताना सत्ताधारी भाजपच्या नेत्यांनी 'मग तुमच्या काळात तुम्ही काय केलं?' असा प्रतिप्रश्न करावा; याचा अनुभव भारतात सातत्याने येतो आहे. हाच तो (राजकीय) व्हॉटअबाऊटिझम!

**सुरुवात कधी झाली?**

व्हॉटअबाऊटिझम या शब्दाचा सर्वप्रथम वापर झाला १९७८ मध्ये. गार्डियन या ब्रिटिश वृत्तपत्रात वाचकांची पत्रे या सदरात हा शब्द वापरण्यात आला. लिओनेल ब्लॉच असं या पत्रलेखकाचं नाव. एखाद्याला जाब विचारावा, या हेतूने हा शब्द वापरला जातो. निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांनी दिल्या गेलेल्या आश्वासनांबाबत मतदारांनी हा प्रश्न पक्षांना विचारायला हरकत नाही. बघा पटतंय का?

**- विनय उपासनी,** मुख्य उपसंपादक, लोकमत, मुंबई

## तिरकस आणि चौकस

गजानन घोंगडे




हे पत्र लोकमत मीडिया प्रायव्हेट लि. करिता **बालाजी मुळे** यांनी लोकमत मीडिया प्रा. लि., प्लॉट क्र. १९२, २०७, २०८, एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर येथे मुद्रित करून लोकमत भवन, पं. जवाहरलाल नेहरू मार्ग, पो. बॉ. क्र.-२१६, नागपूर-४४००१२ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी : ०७१२-२४२३५२७ (७ लाईन्स), फॅक्स : ६६१८५५५ Email : संपादकीय : lkedit.ngp@lokmat.com जाहिरात : advt.ngp@lokmat.com, **प्रसार :** circ.ngp@lokmat.com संस्थापक संपादक : **स्व. जवाहरलाल दर्डा** ■ चेअरमन, एडिटोरियल बोर्ड : **विजय दर्डा** ■ एडिटर-इन-चीफ : **राजेंद्र दर्डा**
■ समूह संपादक तथा संपादक : **विजय बाविस्कर** ■ कार्यकारी संपादक : **श्रीमंत माने*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) लोकमतमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. लोकमत ™ हे चिन्ह लोकमत मीडिया प्रायव्हेट लि. चे व्यापारचिन्ह आहे.